**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानदेव तुळशीराम जावीर
मु.जीखणवाडी, पो.जाधववाडी, ता.खानापूर,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
वन उप विभाग, सांगली,
जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** वन उप विभाग, सांगली
वन क्षेत्रपाल, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.ज्ञानदेव तुळशीराम जावीर<br>मु.जीखणवाडी, पो.जाधववाडी, ता.खानापूर,<br>जि.सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा**<br>वन उप विभाग, सांगली,<br>जि.सांगली श्री.विवेक कुलकर्णी<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** वन उप विभाग, सांगली<br>वन क्षेत्रपाल, जि.सांगली श्री.रा.बु.कांबळे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३.४.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वन मजूर महिलेच्या सेवेबाबत आपल्या मागणीनुसार पूर्ण माहिती जन माहिती अधिकारी तथा वन उप विभाग, सांगली वन क्षेत्रपाल, जि.सांगली यांनी दिली नाही. कागदपत्रांच्या छायांकित प्रती मिळाल्या नाहीत. दि.३०.११.२००८ पर्यंत माहिती देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त मान्य करुनही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.ज्ञानदेव तुळशीराम जावीर यांनी केली.

श्री.जावीर यांनी श्रीमती कुसुम संपत देसाई यांच्या संबंधातील सन १९७५-२००३ या कालावधीतील माहिती मागितली होती. श्रीमती देसाई १९८६ पासून कार्यरत असल्याने सहाय्यक जन माहिती अधिकारी, विटा यांच्याकडून ही माहिती मागविण्यात आली. शोध घेऊन त्यांनी ही माहिती दिल्यानुसार श्री.जावीर यांना देण्यात आली. श्रीमती देसाई यांच्या त्या काळातील हजेरीपत्रकाचा शोध एका पथकामार्फत आठवडाभर घेण्यात आला. कागदपत्रे जुनी असल्यामुळे वाळवीने खालेल्या अथवा खराब अवस्थेत अशीही आढळली. त्यातून प्राप्त झालेल्या दोन हजेरीपत्रकांच्या प्रती पाठविल्या. अपीलकर्त्यास सर्व कागदपत्रे समक्ष दाखविण्याची तयारीही दर्शविली. हजेरीपत्रक हे क वर्गातील असून ५ वर्षांनंतर नाश करावयाचे असतात. तरीही स्वतंत्रपणे शोध घेऊन जुनी हजेरीपत्रके प्राप्त न झाल्यामुळे देता आली नाहीत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा वन क्षेत्रपाल खानापूर, विटा, जि.सांगली श्री.विवेक कुलकर्णी यांनी केले. माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी यांनी केलेला त्यातून दिसतो.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

१. श्री. आप्पासाहेब दादा भगाटे
मु.पो.नांदणी, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर
२. श्री. राजेंद्र मारूतराव बडदारे
२४९, ई वॉर्ड, नागाळा पार्क, प्लॉट नं.१,
सेंट झेविअर हायस्कूल मागे, कोल्हापूर
३. श्री. सुरेश बंडू जाधव
मु.पो. वाटंगी, ता.आजरा, जि. कोल्हापूर
४. श्री. प्रताप हरिभाऊ पाटील
घ.नं. १८१२, बी-वॉर्ड, मंगळवार पेठ,
५. श्री. बाबासो अमृत माळी
सहजीवन गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.८३,
पाचगाव, तस. करवीर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ते

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर
मुख्य कार्यालय, १०९२, ई वॉर्ड, शाहुपुरी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०+१४६ / २००९ / कोल्हापूर, ५९४/कोल्हापूर ७९७/२००९ + ७९८/२००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, जि. कोल्हापूर तर्फे श्री. एल. टी. भोसले, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर मुख्य कार्यालय, १०९२, ई वॉर्ड, शाहुपुरी, कोल्हापूर तर्फे ॲड. श्री. पी. जे. वाघ | |

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ६०/२००९/ कोल्हापूर | १९.१.२००९ | २७.१.२००९ | -- | २४.२.२००९ |
| ६०/२००९/ कोल्हापूर | १२.५.२००८, २३.६.२००८ | २२.५.२००८, १.७.२००८ | १०.१२.२००८ | ३१.१२.२००८ |
| ५९४/कोल्हापूर | २२.८.२००८ | २९.८.२००८ | २९.९.२००८ | २०.१२.२००८ |
| ७९७/२००९/ कोल्हापूर | २.४.२००९ | १३.४.२००९ | -- | ३०.५.२००९ |
| ७९८/२००९/ कोल्हापूर | ३.१२.२००८ | ४.१२.२००८ | -- | २२.५.२००९ |
| ८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जांच्या (जोडपत्र-अ) छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. | | | | |

## विवेचन

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला कोणतेही शासकीय अनुदान अथवा सवलती मिळत नाहीत, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार ही बँक 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी अर्जदारांना माहिती देण्याचे आदेश दिले आहेत. बँकेला कायदा लागू होत नाही, ही भूमिका कायम ठेवून बँकेने वरील सर्व अपिलांमध्ये माहिती दिलेली आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. प्र[illegible] हरिभाऊ पाटील यांनी केले. एनपीएचे प्रमाण वाढल्यामुळे रिझर्व्ह बँकेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासक नेमला असला तरी केवळ त्यामुळे बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे, असे म्हणता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्यासंदर्भात बँकेने मुंबई उच्च न्यायालयात रिट दाखल केले आहे, असेही बँकेचे प्रतिनिधी ॲड. श्री. पी. जे. वाघ यांनी नमूद केले.

बँकेला अर्थ सहाय्य, कर्ज माफी अशा शासकीय सवलतींचा लाभ मिळत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बँकेला लागू होतो. त्यामुळे प्रशासक नसतानाच्या काळातही बँकेने माहिती दिली पाहिजे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे

प्रतिनिधी श्री. एल. टी. भोसले यांनी केले. मात्र बँकेचे प्रतिनिधी ॲड. श्री. पी. जे. वाघ यांनी त्याचा इन्कार केला.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, अशी भूमिका बँकेने प्रथमपासून घेतली आहे. ही भूमिका कायम ठेवून बँकेने माहिती दिली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते. प्रशासक मंडळाच्या नियुक्तीच्या काळात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे अध्यक्ष, उप निबंधक, सहकारी संस्था, व जिल्हा विशेष लेखा परीक्षक हे सदस्य असून प्रशासकीय प्रतिनिधींच्या नियंत्रणाखाली कारभार असतो, हे दिसून येते. प्रशासकाच्या काळातील माहिती बँकेने द्यावी लागेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३०.३.२०१०**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

आप्पासाहेब जिनगोंडा पाटील
मु.पो.मालगाव, ता.मिरज,
जिल्हा सांगली

..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

..... **उत्तरवादी**

१. जनमाहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी,
मालगाव, ता.मिरज,
जिल्हा सांगली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
मिरज, जिल्हा सांगली

३. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, रोजगार
हमी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६००/२०१०/ सांगली |
| २ | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणाऱ्या माहितीचा बोध होत नाही | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.आप्पासाहेब जिनगोंडा पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ , जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि. 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. इकबाल मेहमूद अन्सारी
१०४४, न्यू नाना पेठ,
पुणे-२

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
रास्ता पेठ विभाग, रास्ता पेठ, पुणे-११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
रास्ता पेठ विभाग, रास्ता पेठ, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०२/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/५/२००९, १४/७/२००८, ३/१०/२००८, १२/१२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०/६/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/७/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १/२/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-** सार्वजनिक पदपथावरील अतिक्रमित जागेवरील अनधिकृत विद्युत मीटर काढणेबाबत | |

# विवेचन

अपीलकर्ता श्री. इकबाल मेहमूद अन्सारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केलेले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. सबब अपीलकर्ता श्री. अन्सारी यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

# आदेश

अपील दाखलस्तरावर ाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली, जि.सांगली श्री.के.एच.अन्सारी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री.जे.जे.बार्देस्कर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१२.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

राधानगरी येथे 'बांधा, वापरा, हस्तांतर करा' तत्त्वावर मे.आर.एम.मोहिते टेक्सटाईल्स लि. या कंपनीतर्फे बांधण्यात येत असलेल्या जलविद्युत प्रकल्पाबाबतची माहिती अपूर्ण दिली. ५० रूपये शुल्क घेऊन एकाच पानाची माहिती दिली. दि.४.८.२००४ रोजी माहितीच्या अधिकाराखाली याच संदर्भात आपण मागितलेली माहिती असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी म्हटले असले, तरी तो अर्ज वेगळा होता. त्यामुळे नव्या अर्जानुसार माहिती दिली पाहिजे. जागेला मुदतवाढ दिली नसल्यास दंड करण्याची तरतूद असून त्याबाबतची माहितीही दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी केले.

संबधित कामाची सर्व प्रक्रिया शासनाकडून पूर्ण झाली असून त्याचे पुस्तक आपल्याकडे पाठविण्यात आले आहे. त्यात सर्व माहिती असून बरोबर नकाशाही आहे. दि.४.८.२००८ च्या अर्जानुसार दिलेल्या माहितीविषयी समाधान झाल्याचे श्री.निकम यांनी लेखी दिले आहे. प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावरील असल्याने शासनाकडून जसजशी माहिती उपलब्ध होते तसतशी अर्जदारांना दिली जाते. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. प्रशासकीय कार्यवाहीबाबत श्री.निकम यांचे आक्षेप असल्यास तो भाग माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये येत नाही. अशा प्रकारचा महाराष्ट्रातील हा पहिला प्रकल्प असून कार्यान्वित होणाराही हा पहिला प्रकल्प आहे. दंड

प्रक्रियेबाबतचा निर्णय हा शासन स्तरावर होण्याचा आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.जे.जे.बार्देसकर यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर, जि.कोल्हापूरश्री.जे.जे.बार्देस्कर यांनी स्वत:कडील व हायड्रालिक विभागाकडीलही माहिती प्राप्त करून अपीलकर्त्यास दिली आहे. सुनावणी दरम्यान अपीलकर्त्याने मागितलेली प्रकल्पाबाबतची तपशीलवार माहिती १५ दिवसात आयोगाला सादर करावी व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३०.६.२००९ रोजी श्री.निकम यांना समक्ष माहिती पोहोच केली असल्याचे, माहिती मिळाल्याची पोहोच देणाऱ्या व ५० रूपये शुल्काबाबत स्पष्टीकरण मिळाल्याचे नमूद करणाऱ्या अपीलकर्त्याच्या दि.३.७.२००९ च्या पत्रासह जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.जे.जे.बार्देस्कर यांनी आयोगास अवगत केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण भानुदास महाडीक
मु.पो.अरूण, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०८ / सांगली /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली श्री.एन.एच.राऊत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२०.११.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते.

'आपल्या खात्यातील नोकरीला असणाऱ्या लोकांची त्यांच्या नोकरी काळातील व सर्व कर्मचाऱ्यांच्या बढती संदर्भात,' असे नमूद करून अपीलकर्ता श्री.नारायण भानुदास महाडीक यांनी १२ रकाने असलेल्या नमुन्यात जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, जि.सांगली यांच्याकडे माहिती मागितली होती. लेखा शाखेकडील माहिती १५ दिवसांत देण्यात आली. या शाखेकडे उपलब्ध नसलेली माहिती देण्याबाबत आस्थापना शाखेला कळवून तसे अपीलकर्त्याला कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आस्थापना शाखेला आदेश दिल्यानंतर नेमकी कोणती माहिती हवी, हे स्पष्ट करावे, म्हणजे माहिती देता येईल, असे अपीलकर्त्यास कळविले. संबंधितांची सेवापुस्तके तालुक्याला असल्यामुळे तहसील कार्यालयाला माहिती देण्याबाबत कळविले. त्यानुसार कवठे महांकाळ तालुक्यातील माहिती देण्यात आली. श्री.महाडीक यांनी त्या त्या प्राधिकरणाकडे अर्ज करून माहिती न घेता व कळविल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क न साधता, माहिती प्राप्त झाली नसल्याची तक्रार केली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, जि.सांगली

श्री.एन.एच.राऊत यांनी केले. अशाच आशयाचे तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांचे लेखी निवेदन आयोगाला पूर्वीच सादर केले असल्याचे त्यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी यांची कार्यवाही योग्य आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती अलका शिवाजी वीर
बालकल्याण विभाग,
पंचायत समिती इंदापूर,
जिल्हा-पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था (पुणे शहर-२),
साखर संकुल, शिवाजी नगर,
पुणे -५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,**
सहकारी संस्था, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे -५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६११/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/३/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/६/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-**<br>तापी सहकारी गृहनिर्माण संस्था, इंदापूर या संस्थेतील सदनिकांसदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती अलका शिवाजी वीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केले नसल्याने सदर अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सारंग भाऊसाहेब मदाले
मोना हौसिंग सोसायटी,
एफ/२२, उष:काल कॉलनी रोड,
जुनी सांगवी, पुणे -२७

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक,**
नगर रचना विभाग, पिंपरी -चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१३/२०१०/पुणे |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री, सारंग भाऊसाहेब मदाले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. ए.ए.सय्यद
गंगा नेब्युला सह. गृहनिर्माण संस्था,
विमाननगर, पुणे -१४

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे -५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१५/२०१०/पुणे |
| २ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** गंगा नेब्युला सह. गृहनिर्माण संस्थेतील सभासदांना पुणे महानगरपालिकेमार्फत सदनिकेच्या अंतर्गत बदलासंदर्भातील परवाणगी दिली आहे. काय ? तदनुषंगिक एकूण ६ मुद्दे | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. ए.ए.सय्यद यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक उत्तमराव गायकवाड
मु.पो.शिगांव, रार्जार्षि शाहूनगर, ता.वाळवा,
जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** उपचिटणीस,
गृह शाखा, जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालय,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१८/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| ३. | उपस्थित<br>**जन माहिती अधिकारी तथा** उपचिटणीस,<br>गृह शाखा, जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालय,<br>जि.सांगली श्री.अ.द.कोकाटे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.०१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.०२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.०३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०८.०४.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

विवेचन

अपीलकर्ता श्री.विनायक उत्तम गायकवाड व सौ.प्रमिला पंडित पाटील यांनी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती होण्यासाठी व त्या अनुषंगाने अन्य माहिती मागितली होती. जन

माहिती अधिकारी तथा उपचिटणीस.गृह शाखा, जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालय, जि.सांगली श्री.अ.द.कोकाटे यांनी संबंधित माहिती संकेत स्थळावर उपलब्ध असल्याचे विहित मुदतीत कळविले. श्री.गायकवाड यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे अपील केले. या संदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेल्या नोंदवहीसह अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत व संबंधित माहितीच्या प्रती मिळाव्यात, असा अपीलकर्त्याचा आग्रह असल्याने त्यानुसार १५ दिवसांत निःशुल्क माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांनी दिला. त्यानुसार माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपचिटणीस.गृह शाखा, जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालय, जि.सांगली श्री.अ.द.कोकाटे यांनी केले. अपीलकर्त्याचा मुख्य हेतू विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती मिळण्याचा असून त्याबाबतचा निर्णय जिल्हाधिकारी कार्यकक्षेत नसल्याचे त्यांना स्पष्ट करण्यात आले, असेही श्री.कोकाटे यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.शशिकला नारायणराव देशमुख
शिल्पा अपार्टमेंट, २६१-ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, वि.का.क्र.४,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.शशिकला नारायणराव देशमुख
शिल्पा अपार्टमेंट, २६१-ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.जी.एन.देशमुख

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एम.वाय.देवडे

| | | |
|---|---|---|
| (२)**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एन.एस.सरनोबत, तत्कालीन श्री.एम.एम.निर्मळे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

गुंठेवारी प्रकरणात योग्य माहिती दिली जात नसून भाग नकाशा व मोजणी नकाशा यांच्या प्रतीत मेळ बसत नाही. विकास योजनेतील रस्ता सरळ असणे आवश्यक असून काही धनदांडग्यांनी पैशाच्या जोरावर त्यात हवे तसे बदल करून घेतल्याचे समजते. त्यामुळे योग्य माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता सौ.शशिकला नारायणराव देशमुख यांनी केली.

दोन विभागांशी संबंधित अशी ही माहिती आहे. आपल्या खात्याकडे असलेल्या अलाइनमेंटच्या अनुषंगाने भाग नकाशा देऊ केला व मोजणी नकाशाचे रूपांतर करून माहिती देण्याची तयारी दर्शविली. नकाशाची नक्कल प्रमाणित करून दिली. विकास योजना रस्ता वाकडा आहे, तो सरळ असावा, अशी त्यांची मुख्य मागणी आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एम.वाय.देवडे यांनी केले.

आपल्या बंगल्याच्या दारासमोरील रस्त्याची अलाइनमेंट निश्चित करून देण्याची अपीलकर्त्यांची मुख्य मागणी आहे. तसे करून देता येणार नाही, हे त्यांना स्पष्ट केले आहे.

गुंठेवारीतील रस्ता मुळात नसल्याने स्केल तयार करून त्यांना अतिरिक्त माहितीही दिली आहे. त्या व्यतिरिक्त 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी त्यांनी मागणी केलेली अन्य माहितीही देण्यात आली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.जी.एन.देशमुख यांनी केले.

अपीलकर्त्याने उपस्थित केलेले मुद्दे अन्वयार्थाचे, प्रशासकीय कार्यवाहीचे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांचा समावेश होत नाही. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.३.२०१०**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.निशांत देवराम जोशी
मु.पो.शिरवळ, (शिवाजी कॉलनी), ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.निशांत देवराम जोशी
मु.पो.शिरवळ, (शिवाजी कॉलनी), ता.खंडाळा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एल.कुंभारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.५.२००९ व १४.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.११.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

तलाठी पदावरील नियुक्तीबाबत आपल्यावर अन्याय झाल्यामुळे श्री.एम.एच.आसवले यांना दिलेल्या नियुक्ती पत्रांच्या प्रती आपण मागितल्या होत्या, त्या मिळाल्या नाहीत. तसेच जिल्हाधिकारी, सातारा यांच्या कक्षेतील नोकर भरतीवर उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशाची तारीख कळविली नाही. त्यामुळे आपण न्यायालयात कागदपत्रे सादर करीत नसल्यामुळे नियुक्तीच्या हक्काला वंचित राहत आहोत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.निशांत देवराम जोशी यांनी केली.

श्री.जोशी यांना आवश्यक असलेल्या दोनही पत्रांच्या प्रती व न्यायालयाच्या स्थगिती आदेशाची तारीख आदी तपशील द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. संबंधित कागदपत्रांची मागणी मूळ अर्जात नसली तरी त्याची पूर्तता दि.२५.६.२००९ रोजी करण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.रमेश चव्हाण यांनी दि.२६.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. श्री.जोशी यांनी मागितलेली अतिरिक्त माहितीही सुनावणीच्या दिवशी समक्ष देण्यात आली असून विहित कार्यपध्दतीनुसार त्यांना सरळ सेवा परीक्षा अंतर्गत उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, जि.सातारा यानी दि.३०.७.२००९ च्या आदेशान्वये तलाठी सजा पिंपरी तर्फे तांब, तालुका महाबळेश्वर या पदावर नियुक्ती दिलेली आहे, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा निवासी

उपजिल्हाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.रमेश चव्हाण यांनी दि.१०.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. अपीलकर्त्याला माहिती देण्याबरोबरच मूळ तक्रारीचेही निवारण झाल्याचे त्यातून स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)सौ.सारिका दिलीप लंगरे (अ.क्र.६३८)
(२)श्री.मोहन इराप्पा खडके (अ.क्र.३१९)
(३)श्री.आण्णासाहेब भिमा लंगरे (अ.क्र.३२०)
(४)श्री.जगन ज्ञानबा चव्हाण (अ.क्र.३२१)
(५)श्री.अरूण भिमा लंगरे (अ.क्र.३२२)
मु.मौजे आगर, पो.दत्तनगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध),
जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कोल्हापूर यांचे कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री सोनियाजी महिला सहकारी दूध
व्यवसाय संस्था मर्यादित, आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३८+३१९ ते ३२२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.सारिका दिलीप लंगरे प्रतिनिधी श्री.दिलीप आण्णासाहेब लंगरे
मौजे आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), जिल्हा दुग्ध व्यवसाय
विकास अधिकारी कोल्हापूर यांचे कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.मोहन चांगदेव निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री सोनियाजी महिला सहकारी दूध व्यवसाय संस्था मर्यादित, आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्रीमती चाँदबी आस्कर चिकोडे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.६३८ या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सचिवांच्या राजीनाम्याची प्रत आदी माहिती श्री सोनियाजी महिला सहकारी दूध व्यवसाय संस्था यांच्या सचिव/अध्यक्षांकडे आपली पत्नी सौ.सारिका दिलीप लंगरे यांनी मागितली होती. परंतु ती अद्याप दिलेली नाही. या संस्थेला शासकीय योजनेतून विनियोग भांडवल म्हणून ८०,०००/- रूपये, मिल्को टेस्टर अनुदान ३००० रूपये व टेबल खुर्च्या आदी कार्यालयीन साहित्य मिळाले आहे. म्हणून संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे, असे प्रतिपादन अपीलकर्त्या सौ. सारिका दिलीप लंगरे यांचे प्रतिनिधी श्री.दिलीप आण्णासाहेब लंगरे यांनी केले.

अपीलकर्त्या सौ. सारिका दिलीप लंगरे या संस्थेच्या सचिव होत्या. त्यांनी स्वत: राजीनामा देऊन स्वत:च्या सहीने नवीन सचिव ठराव पूर्ण केला. तसेच बँकेतील खाते नवीन सचिवांच्या नावे होण्याचा ठरावही त्यांनीच केला. मात्र चार्जपट्टीच्या वेळी त्यांनी राजीनामा दप्तरी जमा न करता स्वत:कडेच ठेवून घेतला आहे व त्याचीच प्रत मागून त्या संस्थेला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनी संस्थेत सन २००६-२००७, सन २००७-२००८ या कालावधीमध्ये अपहार

केल्याचे शासकीय लेखा परीक्षण अहवालात स्पष्ट झाले आहे. संस्थेतून राजीनामा देऊन त्यांनी खाजगी दूध संकलन सुरू केलेले आहे. संस्थेविरूध्द सातत्याने तक्रारी करून व वेगवेगळे अर्ज देऊन संस्थेला अडचणीत आणण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने चालविला आहे. त्रयस्थ पक्ष व स्पर्धक म्हणून संस्थेच्या आर्थिक हितसंबंधास हानी पोहोचण्याची शक्यता असल्यामुळे मूळ अर्जानंतर त्यांना माहिती दिली नव्हती. मात्र 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील सूचनेनंतर सुमारे ५०० पानांची माहिती रजिस्टर्ड टपालाने दिली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री सोनियाजी महिला सहकारी दूध व्यवसाय संस्था मर्यादित, आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्रीमती चाँदबी आस्कर चिकोडे यांनी अनुषंगिक कागदपत्रांसह केले. संबंधित दूध संस्थेला भरीव शासकीय अनुदान व सवलती नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तसेच संस्थेने माहिती दिली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.मोहन चांगदेव निंबाळकर यांनी केले.

याच विषयाबाबत पुढील अपिले आयोगाकडे दाखल आहेत. अ.क्र.३१९ ते ३२२. या सव अपिलांच्या अनुषंगाने संस्थेच्या सचिवांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :

माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग करून दूधसंस्था अडचणीत आणण्यासाठी स्वतःचे कुटुंबातील व लगतच्या पाच जणांच्या नावे एकाच दिवशी (दि.३१.१०.२००८) माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज दिलेले आहेत. अर्जदारांची नावे आणि त्यांचा कौटुंबिक संबंध याप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.सारिका दिलीप लंगरे | अपीलकर्ता / संस्थेच्या सचिव |
| २. | श्री.मोहन इराप्पा खडके | अपीलकर्ता यांचे वडील |
| ३. | श्री.आण्णासाो भिमा लंगरे | अपीलकर्ता यांचे सासरे |
| ४. | श्री.अरूण भिमा लंगरे | अपीलकर्ता यांचे चुलतसासरे |
| ५. | श्री.जगन ज्ञानबा चव्हाण | अपीलकर्ता यांचे जवळचे मित्र |

सदरचे सर्व अर्ज एकाच हस्ताक्षरात व एकाच दिनांकाचे आहेत.

संस्थेने या सर्व अर्जदाराना माहिती पुरविलेली आहे. मात्र विविध चुकीच्या पध्दतीने संस्थेस आर्थिक डबघाईस आणण्यासाठी अपिले दाखल केलेली आहेत.

वरील बाबी लक्षात घेता अपील क्र.३१९ ते ३२२ या अपिलांबाबतही पुढील निष्कर्ष लागू होतात, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

श्री सोनियाजी महिला सहकारी दूध व्यवसाय संस्था मर्यादित, आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५कलम २(एच) मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरते, याचे अपीलकर्त्याने सादर केलेले पुरावे पुरेसे नाहीत. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे निवेदन लक्षात घेता संस्थेच्या आर्थिक हितसंबंधाशी निगडीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(१)(५)) अंतर्गत हा विषय असल्याचे दिसते. तरीही संस्थेने माहिती दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. धीरज शशिकांत लुंकड
३४८, एस.टी.रोड, स्वामी विवेकानंद हायस्कूल समोर,
दापोडी, पुणे-१२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहाय्यक आयुक्त (जकात), **उत्तरवादी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**जन माहिती अधिकारी,**
जकात विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४५/२०१०/पुणे |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/०१/२०१० |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/०२/२०१० |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>मेमो क्र. २००९२६०८०१५००२ व मेमो क्र. २००९०३०८०४६७१३ बाबतची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. धीरज शशिकांत लुंकड यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकारी याचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे तसेच पुरेशे शुल्क (रु.२०/-चे मुद्रांक/पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.अरूण राजाराम निंबाळकर
(२)श्री.राजू बाळासाहेब गोरे
मु.पो.हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक,उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५०+६४७ / कोल्हापूर /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.अरूण राजाराम निंबाळकर
(२)श्री.राजू बाळासाहेब गोरे
मु.पो.हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती एन.व्ही.गायकवाड
**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.ए.पी.खामकर

| | |
|---|---|
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकाऱ्यांना स्मरणपत्रे देऊनही त्यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांना स्मरणपत्रे पाठवूनही त्यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही अपीलकर्ते (१)श्री.अरूण राजाराम निंबाळकर (२)श्री.राजू बाळासाहेब गोरे यांनी केली.

श्री.निंबाळकर यांनी पाच संस्थांची माहिती मागितली होती. त्यातील चार संस्थांची माहिती प्राप्त करून घेऊन दिली. त्यांच्या प्रती सोबत आणल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.ए.पी.खामकर यांनी नमूद केले.

वडगाव कृषी उत्पन्न बाजार समिती, पेठवडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या समितीची निवडणूक माहे एप्रिल २००८ रोजी पूर्ण होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आलेले आहे. तरीदेखील आजतागायत हातकणंगले तालुक्यातील काही विशिष्ट व्यक्ती आर्थिक दुर्बल गटातील अर्जांबाबतची माहिती सातत्याने या कार्यालयाकडे विशिष्ट हेतू ठेवून मागणी करतात. कृषी उत्पन्न बाजार समिती हीदेखील माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिकार कक्षेत येते. त्या समितीकडे अथवा चेअरमन / सचिव यांचे नावे या व्यक्ती अर्ज करीत नाहीत अगर माहिती मागत नाहीत. कोल्हापूर जिल्ह्यातील ही महत्त्वाची बाजार समिती असून त्या संस्थेतील प्रतिनिधी राजकीयदृष्ट्या प्रभावी असल्याने त्यांचेकडे मागणी न करता या कार्यालयाला वेठीस धरणेचा प्रयत्न करतात. सदरची माहिती कृषीउत्पन्न बाजार समितकडे निवडणूक कार्यक्रम संपताच सीलबंद करून दिलेली आहे. बाजार समितीकडे या कार्यालयाने सातत्याने पाठपुरावा करून जी माहिती नुकतीच उपलब्ध झाली आहे ती सोबत सादर करीत आहोत. १.श्री.राजू बाळासो

गोरे, २. श्री.प्रकाश बाबुराव नरंदेकर, ३.श्री.दत्तात्रय केरबा बिडकर, ३.श्री.दत्तात्रय केरबा बिडकर, ४.श्री.महादेव रामचंद्र माने, ५.श्री.सूर्यकांत बाळासो मकोटे, ६.श्री.सुरेश आ.गडगे या व्यक्ती सातत्याने माहिती अधिकाराचा गैरवापर करून अनेक शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन विशिष्ट हेतूने माहिती मागणी करणे, माहिती न मिळाल्यास अपील करणेची भिती घालणे, शक्य असेल तेथून पैसे उकळणे, शासकीय अधिकारी /कर्मचारी यांची बदनामी करणे, नकारात्मक बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द करणे, खोट्या तक्रारी दाखल करणे इत्यादी प्रकारचे उपद्व्याप करतात, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर सौ.निलिमा गायकवाड यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. हे निवेदन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.बी.आर.डोंगळे दि.२४.६.२००९ यानी आयोगापुढे सादर केले.

अपिलाची सुनावणी न घेणे व माहिती पुरविण्याबाबत कार्यवाही न करणे या संदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लेखी खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी दि.१.७.२००९ च्या पत्रान्वये सविस्तर निवेदन सादर केले. पतसंस्थाविषयक आंदोलनामुळे सुनावणीला उपस्थित न राहता आल्याचा खुलासा त्यांनी केला आहे. तसेच हातकणंगले तालुक्यात एकूण २००० सहकारी संस्था आहेत. त्यापैकी ४०० नागरी व ग्रामीण बिगरशेती सेवा संस्था, तीन साखर कारखाने, १०० ग्राहक संस्था, २२ बँका, १५० पाणीपुरवठा संस्था, खरेदी विक्री संघ, बाजार समिती, गृहनिर्माण संस्था अशा व इतर प्रकारच्या अनेक संस्था आहेत. या सर्व प्रकारच्या संस्थांचे नोंदणी कामकाज सांभाळून माहिती अधिकारातील माहिती देण्याचे व अपिलांच्या सुनावणीचे कामकाज केले जाते. तसेच श्री.राजू गोरे यांच्या पूर्वी मार्केट कमिटीची माहिती श्री.दत्ता बिडकर याना दिली असून श्री.अरूण निंबाळकर यांना माहिती देण्याकरता पत्र देऊनही माहिती त्यांनी नेली नाही, असेही श्रीमती गायकवाड यांनी निवेदनात म्हटले आहे.

'समितीचे निवडणुकीचे कामकाज झालेनंतर निवडणूक कागदपत्रे निवडणूक अधिकारी यांनी सिलबंद करून मार्केट कमिटीचे सचिव यांचे ताब्यात दिली. सिलबंद नसलेले उमेदवारी अर्ज त्यांच्याकडून उपलब्ध करून तीन व्यक्तींना माहिती अधिकारांतर्गत माहिती दिली आहे. संबंधित अपीलकर्ता यांना त्यांचेकडून माहिती मिळाली आहे,'असे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे यांनी दि.१.७.२००९ च्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्या निवेदनातील वरील बाबी गंभीर असून त्याबाबत शहानिशा होणे आवश्यक आहे. माहिती देण्याबाबत केलेल्या प्रयत्नांचा व अडचणींचा त्यांनी केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे. मात्र संबंधित पत्रव्यवहाराबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नमूद केलेल्या तरतुदीनुसार काटेकोर कार्यपध्दती अवलंबिण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१७.३.२०१०